**वाचले :-**

१) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७.
२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.९ मे २०२२
३) आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/२८६/२०२४, दि.२३/०१/२०२४
४)आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/१०६३/२०२४, दि.१८/०७/२०२४
५) मा.सह शहर अभियंता, झोपडपट्टी निर्मूलन व पुर्नवसन स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. झोनिपु/स्था/१०/कावि/३७/२०२५ दि.१७/०२/२०२५
६) मा.शहर अभियंता, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील पत्र क्र. बीपी/०१/कावि/अस्था/१४७/ २०२५ दि.२०/०२/२०२५
७) श्री.बिरंजे रोहित पंडित, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा दि.१७/०२/२०२५ रोजीचा विनंती अर्ज
८) श्रीम.ठोंबरे कोमल शिवाजी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचा दि.१८/०२/२०२५ रोजीचा विनंती अर्ज
९) मा.आयुक्त यांचेकडील दिनांक११ /०३/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/६१/२०२५
दिनांक ११ /०३/२०२५

**विषय :- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमतः ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. ३ व ४ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील काही उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग येथे जलसंधारण अधिकारी या पदावर निवड झाल्याने राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. या उमेदवारांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.बिरंजे रोहित पंडित | १६/०२/२०२४ | १७/०२/२०२५ | C/३८०६ दि.१७/०२/२०२५ अन्वये र.रू. २०,५००/- | महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग येथे जलसंधारण अधिकारी या पदावर निवड |
| २ | श्रीम.ठोंबरे कोमल शिवाजी | २६/०७/२०२४ | १८/०२/२०२५ | C/३८५४ दि.१८/०२/२०२५ अन्वये र.रू. १९,९००/- | |

उपरोक्त स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांनी स्तंभ क्र. ६ मधील पदावर निवड झाल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी वाचले क्र.७ व ८ अन्वये विनंती केली आहे. उपरोक्त स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नाही व सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत संबंधित विभागप्रमुखांनी वाचले क्र.५ व ६ अन्वये स्पष्टपणे शिफारस केली आहे. उपरोक्त स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाचा मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरल्याची पावती सादर केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील वाचले क्र.१ व २ मधील शासन निर्णयातील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये स्तंभ क्र. २ मधील कर्मचा-यांचा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाचा मनपा सेवेचा राजीनामा स्तंभ क्र. ४ मधील दिनांकापासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच स्तंभ क्र. ४ मधील दिनांकापासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबधित कर्मचा-यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति -
श्री.बिरंजे रोहित पंडित, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
श्रीम.ठोंबरे कोमल शिवाजी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
प्रत -
१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५.कामगार कल्याण विभाग ६.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२, संग.कक्ष (साप्रवि) ७.झोनिपु विभाग ८.सर्व संबंधित विभाग
९.बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग ११.माहिती तंत्रज्ञान विभाग

सहायक आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८